# मुंबई विद्यापीठ

परीक्षा नियंत्रकांचे कार्यालय,
महात्मा जोतीराव फुले भवन
विद्यानगरी,
सांताक्रुझ (पुर्व),
मुंबई - ४०० ०९८,

क्र. परीक्षा /प.नि./मार्गदर्शकसूचना (मराठी)/९०-क/ २०११ दि. १९ मार्च, २०११

## बार कोडेड व ओ.एम.आर. प्रकारच्या उत्तरपुस्तिकांसंबंधि सामान्य मार्गदर्शक सूचना

### फक्त परीक्षार्थीसाठी:-

१. परीक्षार्थींना परीक्षा सुरु होण्यास १० मिनिटे असताना परीक्षा कक्षामध्ये प्रवेश देण्यात येईल.

२. परीक्षार्थींनी न विसरता प्रवेशपत्रिका ( हॉल तिकिट ) आपल्या सोबत परीक्षा कक्षामध्ये आणणे बंधनकारक आहे.

३. सर्व परीक्षांसाठी आठ अंकी परीक्षा सांकेतांक (परीक्षा कोड) विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ठेवण्यात आलेला असून, सर्व महाविद्यालयांकडे पूर्वीच परिपत्रकाद्वारे ( परिपत्रक क्र. परीक्षा /प.नि./ ७८ / २०११, दि. ०९ मार्च, २०११ ) पाठविण्यात आलेला आहे.

४. परीक्षार्थींनी आपल्या परीक्षेसाठी आवश्यक असलेला आठ अंकी परीक्षा सांकेतांक (परीक्षा कोड) माहित करून घ्यावा, अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे.

५. परीक्षार्थींना परीक्षेच्या संबंधित पेपर / विषयासाठी एकच बार कोडेड तथा ओ.एम.आर. प्रकारची उत्तरपुस्तिका देण्यात येईल.

६. पेपर / विषयाचे दोन विभाग असल्यास दोन वेगळया उत्तरपुस्तिका दिल्या जातील.

**७. उत्तरपुस्तिकांमधील पृष्ठसंख्या वाढवल्याने परीक्षार्थींना पुरवण्या देण्यात येणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.**

८. लेखनासाठी ३६ कोरी पाने असल्याने परीक्षार्थींनी दिलेल्या उत्तरपुस्तिकेतील जागेतच आपली उत्तरे लिहावीत, अशी विनंती करण्यात येत आहे.

९. उत्तरपुस्तिकांवर असंबध्द अथवा अपशब्द लिहू नयेत, ते अनुचित मानले जाईल.

१०. उत्तरपुस्तिकेच्या द्वितीय पानावरील मुद्रित सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.

११. उत्तरपुस्तिकांच्या मुखपृष्ठावर निर्धारित परीक्षा सांकेतांक (परीक्षा कोड) अंकात लिहावेत व ओ.एम.आर. स्वरूपात हि माहिती गोळे /वर्तुळे काळे किंवा गडद करून काळजीपूर्वक भरावी.

१२. ओ.एम.आर. स्वरूपातील माहिती गोळे / वर्तुळे काळे करून किंवा काळया बॉलपेनाने गडद करून भरावी.

१३. परीक्षार्थींनी आवश्यक माहिती परीक्षार्थींच्या (भाग-१) प्रतीवर व परीक्षकांच्या (भाग-२) प्रतीवरील टिंबकित रेषेच्या आतील माहिती फक्त भरावी.

१४. परीक्षार्थींनी स्वतः आठ अंकी परीक्षा क्रमांक व प्रश्नपत्रिकेवरील उजव्या बाजुस वरती असलेला क्रमांक (प्रश्नपत्रिका क्रमांक), उत्तरपुस्तिकांच्या ठरावीक जागी नमुद केलेल्या व आतील डाव्या बाजूच्या कडेच्या तळातील चौकोनांमध्ये व मागील पृष्ठावर लिहावा.

१५. परीक्षार्थींनी गोळे / वर्तुळे काळे किंवा गडद करताना काळजी घ्यावी.

१६. परीक्षार्थींनी परीक्षाक्रमांक चौकोनात लिहावा व ओ.एम.आर. स्वरूपात गोळे / वर्तुळे काळे करावे अथवा ते गडद करावे.

**१७. गोळे / वर्तुळे काळे अथवा गडद करताना चूक झाल्यास त्यावर फक्त फुली (X) मारावी व नंतर योग्य किंवा बरोबर त्या अंकांची गोळे / वर्तुळे काळे अथवा गडद करावेत.**

१८. परीक्षार्थींचा क्रमांक लिहिण्यासाठी सात चौकोन पुरवण्यात आले आहेत.

१९. आसन क्रमांक सात अंकांपेक्षा जर कमी असल्यास आवश्यक तेवढे शून्य आसन क्रमांकापूर्वी लिहावेत.

उदाहरणार्थः- १) परीक्षार्थींचा आसन क्रमांक ४९२७ असल्यास

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ० | ० | ० | ४ | ९ | २ | ७ |

असे लिहावे

२) परीक्षार्थींचा आसन क्रमांक १९५ असल्यास

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ० | ० | ० | ० | १ | ९ | ५ |

असे लिहावे

२०. उत्तरपुस्तिकांमध्ये आवश्यक माहिती परीक्षार्थींनी खालील महत्वाच्या ठिकाणी भरावी.

अ) परीक्षार्थींच्या प्रतीत (भाग-१) ओ.एम.आर. स्वरूपाची माहिती

ब) परीक्षकांच्या प्रतीत (भाग-२) डाव्या बाजूला टिंबकित रेषेच्या आत ओ.एम.आर. स्वरूपात युनिक परीक्षा कोड क्रमांक, प्रश्नपत्रिका क्रमांक, विषय क्रमांक (असल्यास) व परीक्षेची तारीख.

क) परीक्षा कोड व प्रश्नपत्रिका कोड क्रमांक डाव्या बाजूच्या समासात तळातील चौकोनी जागेत भरावेत.

ड) परीक्षा कोड व प्रश्नपत्रिका कोड क्रमांक शेवटच्या पृष्ठावरील वरच्या बाजूच्या चौकोनी जागेत भरावेत.

२१. परीक्षार्थींनी उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी पेपर / विषयाचे नाव पडताळून पहावे.

२२. परीक्षार्थींनी बार कोडेड उत्तरपुस्तिका काळजीपूर्वक हाताळाव्या.

२३. बार कोड व टाईम बॅन्ड या दोहोंवर रेघोटया मारू नये किंवा त्यांच्यात फेरफार करू नये, तो अनुचित प्रकार मानला जाईल.

# मुंबई विद्यापीठ

२४. परीक्षार्थींनी उत्तरपुस्तिकांवर किंवा आत बाजूला परिचय दाखवणाऱ्या खुणा करू नये, तो अनुचित प्रकार मानला जाईल.

२५. परीक्षार्थींनी ओ.एम.आर. प्रकारचे गोळे / वर्तुळे काळे अथवा गडद करताना जर अनवधनाने चूक झाल्यास त्याची काळजी करू नये परीक्षा विभाग त्याची काळजी घेईल. **(त्या बाबतच्या दुरूस्तीची सूचना क्र. १७ मध्ये दर्शविल्याप्रमाणे करावी)**

२६. बार कोडेड अथवा ओ.एम.आर. उत्तरपुस्तिकांचे स्वरूप विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२७. परीक्षेकरिता **"रहा आनंदी नको कॉपी"** आणि **"ज्ञान आहे तुजपाशी मग कॉपी कशासाठी"**

**"सर्व विद्यार्थ्यांना हार्दिक शुभेच्छा!"**

आपला,

(प्रा. विलास ब. शिंदे)
परीक्षा नियंत्रक